# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - संगीत
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ.विद्या मलवडकर

मनातल्या भावनांचे,शब्दबद्ध होई गीत
करी संगीत साधना तनमन प्रफुल्लित.. || धृ ||

गीत मधुर गुंजते, स्वर दैवी प्रकटती
नाद,ताल,लय, राग,आनंदात आळवती
कोकिळेची कुहू कुहू, जागवते मनी प्रीत
करी संगीत साधना, तन मन प्रफुल्लित....१

तानसेन, कानसेन, संगीताचे उपासक
शारदेचे वरदान, जीवन हे कलात्मक
बाळा जोजवी अंगाई, प्रेमी गाती प्रेमगीत
करी संगीत साधना, तन मन प्रफुल्लित....२

अलंकार नानाविध, आरोह नि अवरोह
दहा थाट, नऊ राग, गायन तृप्तीचा डोह
हृदयाच्या वाळवंटी, येई लहर ती शीत
करी संगीत साधना, तनमन प्रफुल्लित....३

भजनाने कीर्तनाने, ईश्वरास घालू साद
अंतःकरणात दीप, भक्तीचा तो जडे नाद
नृत्य, गीत, गायनाचा, संगम हे संगीत
करी संगीत साधना तन मन प्रफुल्लित....४

Anahat Music Therapy